


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - १ ले. ✻ अंक २६४ वा. ✻ शनिवार दि.२६ एप्रिल २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 1 ✻ Ishue - 264 ✻ Saturday 26 April 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

## देशातील २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा; हवामानात मोठा बदल



नवी दिल्ली/ पुणे : देशात पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल झाला आहे. एकीकडे देशातील अनेक भागांना उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसत आहे, तर दुसरीकडे २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

उत्तर आणि पश्चिम भारतामध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वेस्टर्न डिस्टबन्समुळे जम्मू-कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांमध्ये २५ आणि २६ एप्रिल रोजी वादळी वा-यासह अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.बांगलादेश आणि आसामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे पूर्व भारतात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मिझोरम, नागालँड, या राज्यांमध्ये पुढील सात दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

तसेच या राज्यांमध्ये वादळे देखील होणार असून, या काळात ताशी ६० ते ७० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर आयएमडीकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दक्षिण भारताना देखील पाऊस झोडपून काढणार आहे. दक्षिण भारतामध्ये तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आध्र प्रदेश आणि पाँडेचेरी या राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दुसरीकडे बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये देखील जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, सिक्कीममध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

**महाराष्ट्रात उष्णतेचा तडाखा**

महाराष्ट्रात मात्र उष्णतेचा तडाखा बसणार आहे, आणखी काही दिवस महाराष्ट्रात उष्णतेची लाट पाहायला मिळणार आहे. राज्यात ब्रम्हपुरीमध्ये सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याला हाय अलर्ट देण्यात आला आहे.

# तिन्ही सैन्य दल हायअलर्टवर

## उत्तर काश्मिरात राफेलच्या घिरट्या, लष्करप्रमुखांनी घेतला नियंत्रण रेषेचा आढावा;काही तरी मोठे घडणार ?

नवी दिल्ली : पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याचा बदला घेतला जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे बोलून दाखवले. या पार्श्वभूमीवर भारताचे तिन्ही सैन्यदल हायअलर्टवर आहे. अचानक काही घडलेच तर त्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारताचे वायूदल, भूदल, नौदल सज्ज झाले.

दरम्यान, उत्तर काश्मीरमध्ये रात्रीपासून राफेल विमान घिरट्या घालत आहे. राजस्थान बॉर्डरवरील बीएसएफ फौजांनाही सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच लष्कर प्रमुखांकडून नियंत्रण रेषेचा आढावा घेण्यात आला. त्यामुळे काही तरी मोठे घडणार



असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

भारतीय सेनेकडून युद्धासाठीची रणनीती आणि शस्त्राभ्यास याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. पाकिस्ताजवळील एलओसीवर सर्वात पुढे भारतीय भूदलाचे सैनिक असतात. पहलगाम घटनेनंतर भूदल अलर्ट मोडवर गेले आहे. भूदलाने राजस्थानमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी युद्धाभ्यास केला आहे. भारतीय सेनेने याला नियमित युद्धाभ्यास असल्याचे सांगितले आहे. मात्र, सध्याच्या पार्श्वभूमीवर सैनिकांनी तयारी केली आहे.

भारतीय भूदलातर्फे व्हिक्टर फोर्स, राष्ट्रीय रायफल्स, पॅरा स्पेशल पोर्स यूनिटसला दक्षिण काश्मीर आणि एलओसीच्या आसपास तैनात करण्यात आले आहे.

तसेच मोस्ट फॉरवर्ड पोस्टवर टी-९० भीष्म टँक, स्पाईक यासारख्या अँटी टँक गायडेड मिसाईल सिस्टिम्स, पिनाका मिसाईल सिस्टिम्स तैनात करण्यात आल्या आहेत. हेरोन तसेच स्वदेशी ड्रोनच्या माध्यमातून एलओसीच्या पलीकडे नेमके काय चालले आहे, यावर २४ तास लक्ष ठेवण्यात येत आहे.

यासोबतच भारताची वायुसेनादेखील दक्ष झाली आहे. भारताचे सुखोई-३० एमकेआय, मिराज-२००० आणि राफेल विमान पंजाब, जम्मू आणि श्रीनगर एअरबेसवर तयार आहेत.

याशिवाय नौदलानेही पश्चिमी समुद्रावर आपली गस्त वाढवली आहे. अरबी समुद्रात मिसाईल विध्वसंक, फ्रिगेट्स यासारखी प्रमुख जहाजे गस्तीवर आहेत. आयएनएस विक्रांतला कारवार बेसवर तैनात करण्यात आले आहे. नौदलाकडे असणारे हेलिकॉप्टर्स, एअरक्राफ्ट्सही तयार ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे पाकिस्तानविरोधात काही तरी मोठे घडणार, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## शरद पवारांच्या पक्षांमध्ये पुन्हा भाकरी फिरणार ?

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये पुन्हा एकदा भाकरी फिरणार का? अशी शक्यता वर्तवली जात आहे. पक्षाच्या वतीने सर्व प्रवक्ता या पदावरील नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी या संदर्भातले आदेश दिले आहेत.

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार पक्षाच्या १६ एप्रिल रोजी झालेल्या बैठकी नंतरच याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीमध्ये सरकारच्या वतीने पाणीपत येथे बनवण्यात येणा-या स्मारकाला समर्थन नको, अशी भूमिका पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मांडली होती. मात्र, जितेंद्र आव्हाड यांच्या या भूमिकेला पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी कडाडून विरोध केला. त्यामुळे या बैठकीमध्ये चांगलीच खडाजंगी झाली. पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्यांनी मांडलेल्या भूमिकेला होणारा विरोध पाहता महेश तपासे यांची मुख्य प्रवक्ता पदावरून उचलबांगडी करण्यात येणार आहे. मात्र, त्यांची उचलबांगडी करण्यासाठी आधी सर्वच प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**इतर नेते तपासे यांच्यावर नाराज**

महेश तपासे यांनी या निर्णयाला केलेला विरोध यामागे देखील काही कारण आहे. महेश तपासी यांचे आजोबा आणि माजी राज्यपाल गणपत तपासे यांनी याआधी पाणीपत येथे शौर्य स्मारक बांधले आहे. त्यामुळे सरकारच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या स्मारकाला महेश तपासे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. या संदर्भात महेश तपासे यांनी आधीच पाठिंबा दिल्यामुळे पक्षातील इतर नेते त्यांच्यावर नाराज असल्याची माहिती देखील सूत्रांनी दिली आहे. त्यामुळेच आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे बोलले जात आहे.

## पेहलगाम घटनेचा शिराळा येथे सर्वपक्षीय निषेध

### मृत्यू पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली



शिराळा : जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे भारताच्या विविध भागातून आलेल्या२८ पर्यटकावर दहशतवाद्यांकडून अमानुषपणे गोळीबार करून त्यांची हत्या करण्यात आली. सर्वच पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुल त्यांच्या हत्या करण्यात आली. या भ्याड हल्ल्याचा शिराळा येथील मरेमी चौक येथे सर्व पक्षीय निषेध करण्यात आला. रणधीर नाईक यांनी काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांच्यावर निर्घृण हल्ला केला व अनेक निर्दोष पर्यटकांची हत्या केली. या घटनेचा निषेध करण्यासाठी तसेच मृत्यू पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व्हाट्सअप द्वारे पोस्ट पाठवून शिराळकर नागरिकांनी पक्षभेद विसरून एकत्रित येण्याचे आव्हान केले होते. पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांकडून **(पान ३ वर)**

## कराड दक्षिणचे काम खरोखरच अभिमानास्पद : आ.रवींद्र चव्हाण





कराड - भाजप पश्चिम महाराष्ट्र विभाग गाव चलो वस्ती चलो अभियान व संघटनपर्व आढावा बैठक हॉटेल फर्न रेसिडेन्सी, कराड येथे भाजपा महाराष्ट्र प्रदेशचे कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. याप्रसंगी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत अभियानाचे महत्त्व अधोरेखित केले.

बैठकीस कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले, कराड उत्तरचे आ. मनोजदादा घोरपडे यांचेसह बहुसंख्य भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. आमदार डॉ. अतुलबाबा भोसले म्हणाले, कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये प्राथमिक सदस्यांची नोंद ८२, ६४५ इतकी झाली आहे.

सातारा, सांगली व कोल्हापूर या पश्चिम महाराष्ट्रातील २६ विधानसभा मतदारसंघाचा जर विचार केला तर या सगळ्यामध्ये अतिशय चांगले काम कराड दक्षिणने केले आहे ते निश्चितच अभिमानास्पद आहे. विशेषतः मतदारसंघातील ३४२ बूथ समित्या पूर्ण आहेत. त्यामुळे पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी आम्ही योग्यरित्या पार पाडली आहे, हे स्पष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार डॉ. अतुलबाबा भोसले पुढे म्हणाले, काँग्रेस मुक्तचा नारा राष्ट्रीय स्तरावर पक्षाने दिला आहे तोच नारा आम्ही मतदारसंघामध्ये दिला असून काँग्रेसमुक्त कराड दक्षिण प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वजण एकदिलाने प्रयत्न करीत आहोत. या मतदार संघातील काँग्रेसचे सगळे स्ट्रक्चर आम्ही डिसमेंटल केले आहे आणि ते गोडावून मध्ये ठेवले आहे. पक्षवाढीत जे चांगली भूमिका बजावतील त्यांना नक्कीच मोठी संधी दिली जाईल असा विश्वासही यावेळी बोलताना व्यक्त केला.

## कराडमध्ये २६ एप्रिलला श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा




कराड (लक्ष्मीपुत्र) - सालाबादप्रमाणे श्री स्वामी समर्थ कृपेने शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याप्रसंगी अगत्यपुर्वक उपस्थित राहावे असे आवाहन श्री स्वामी समर्थ भक्त विजयसिंह यादव यांनी केले आहे.

२६ एप्रिल रोजी सायंकाळी सात ते दहा या वेळेत महाप्रसाद होणार असून शाळा नं. ३, हेड पोस्ट ऑफिसजवळ, शनिवार पेठ, कराड येथे श्री स्वामी समर्थांचे सर्व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. लोकशाही आघाडीचे अध्यक्ष, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, श्री स्वामी समर्थ भक्त विजयसिंह यादव, प्रशांत यादव, संजय यादव, शिवरत्न यादव, देवराज यादव, रुद्रप्रतापसिंह यादव संग्राम सणस यांच्या उपस्थितीत श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा संपन्न होणार आहे.

## कराडला हॉस्पिटलचे बिल माफ कसे करावे या विषयावर व्याख्यान

कराड - माजी खा. स्व. प्रेमलाताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट व संकल्प सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी (दि. २७) हॉस्पिटलचे बिल माफ कसे करावे, या विषयावर व्याख्यान होणार आहे. रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांचे जाहीर व्याख्यान असून, सौ. वेणूताई चव्हाण सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता व्याख्यान होईल. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या व्याख्यानात उमेश चव्हाण हे कराड व परिसरातील नागरिकांना वैद्यकीय मदत कशी मिळवावी, मोफत उपचार कसे मिळवावेत, शासनाच्या उपचार व शस्त्रक्रियांसाठी लाखो रुपयांच्या योजना कोणत्या, रुग्णांचे हक्क व अधिकार काय आहेत, कोणत्या हॉस्पिटलमध्ये रुग्णांचे संपूर्ण बिल माफ होते आदी महत्वाच्या विषयांवर व्याख्यान देणार आहेत. यावेळी सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## डॉ.किरण मोघे माहिती उपसंचालक पदी रुजू



पुणे : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी डॉ. किरण मोघे यांची माहिती उपसंचालक पदी पदोन्नती झाल्याने त्यांनी पुणे विभागीय माहिती उपसंचालक पदाचा कार्यभार स्विकारला. प्रभारी उपसंचालक श्रीमती वर्षा पाटोळे यांच्याकडून त्यांनी उपसंचालक पदाचा पदभार स्विकारला.

डॉ. मोघे हे यापूर्वी मुख्यमंत्री सचिवालयात जनसंपर्क अधिकारी तथा माहिती अधिकारी म्हणून तर नांदेड, रत्नागिरी, नंदूरबार, अहिल्यानगर,नाशिक तसेच पुणे येथे जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्यरत होते. त्यांच्याकडे नाशिक विभागीय माहिती उपसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला आहे.

प्रभारी उपसंचालक श्रीमती पाटोळे यांनी प्रभारी उपसंचालक म्हणून चांगले काम केल्याचे यावेळी उपसंचालक डॉ. मोघे यांनी नमूद केले. सामुहीक प्रयत्नातून सर्वांनी कार्यालयाचे कामकाज अधिक चांगले होईल असे प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले. श्रीमती पाटोळे आणि कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी डॉ.मोघे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी डॉ.रविंद्र ठाकूर, माहिती अधिकारी सचिन गाढवे,प्रदर्शन सहायक विलास कसबे, वरिष्ठ लिपिक सचिन बहुलेकर, वैशाली रांगणेकर, स्वाती साळुंके, सुहास सत्वधर, सुवर्णा पालकर, आराध्या लोंढे, रावजी बांबळे, वर्षा कोडलिंगे आदी उपस्थित होते.

## उन्हाची तीव्रता वाढल्याने नागरिक त्रस्त

### दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट

पुसेसावळी(सनी लोहोरा) : खटाव तालुक्यासह परिसरात गेल्या काही दिवसांपासून तापमानात सतत वाढ होत असून उन्हाचा चटका दिवसेंदिवस तीव्र होत आहे. उन्हाच्या झळांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. पुढील काही दिवसांत कमाल तापमानात वाढ होणार असल्याची शक्यता देखील हवामान शास्त्र विभागाने वर्तवली आहे. तालुक्यातील वडूज, पुसेसावळी, मायणी, व अन्य मुख्य बाजारपेठ असणाऱ्या शहरात दुपारच्या वेळेस रस्त्यांवर शुकशुकाट पाहावयास **(पान २ वर)**



**जनजागृती करणे गरजेचे**

वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.उन्हाळ्यात घामामुळे शरीरातील पाणी कमी होने उष्माघाताचा धोका वाढणे आणि त्वचेच्या समस्या देखील उद्भवू शकतात.उष्णतेमुळे जीवितहानी होण्याची शक्यता ही नाकारता येत नाही.उन्हाचा फटका बसू नये यासाठी काय काळजी घ्यावी, तसेच कोणते कपडे परिधान करावे अशा विविध व्यापक जनजागृती करणे आरोग्य विभागाने गरजेचे आहे.

## संपादकीय....

# एकजूट दाखवावीच लागेल!

पहलगाममधील दहशतवादी हल्ला हा पाकिस्तानच्या सुनियोजित कटाचा भाग आहे असे सांगण्यात येत आहे. या कटात पाकिस्तानने लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदसारख्या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांचा वापर केला आहे. मंगळवारचा हल्ला अमरनाथ यात्रा सुरू होण्यापूर्वी यात्रेकरू आणि पर्यटकांमध्ये भीती पसरवण्यासाठी करण्यात आला आहे. टीआरएफ संघटना काश्मीरमध्ये मोठे आव्हान बनण्याची शक्यता आहे. या संघटनेला लक्ष्य साधण्यासाठी जंगलात किंवा उंच ठिकाणी लपून बसण्याबद्दलची चांगली माहिती आहे. टीआरएफला फाल्कन स्क्वॉड असेही संबोधतात. हा गट 'हिट अॅण्ड रन' या धोरणावर काम करतो. त्यांच्याकडे प्रगत शस्त्रास्त्रे आहेत. टीआरएफ हा लष्कर-ए-तैयबाचाच एक छोटा गट आहे.

या दहशतवाद्यांनी काही दिवसांपूर्वी पहलगाममध्ये रेकी केली होती आणि संधी मिळताच हा हल्ला केला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळ्या झाडल्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला. बाजूच्या जंगलात ते पळून गेले. टीआरएफ या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. हल्लेखोर पोलिसांच्या गणवेशात आले होते. पर्यटकांना धर्म विचारून त्यांनी गोळ्या झाडल्या. हल्ल्याची माहिती मिळताच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तातडीने जम्मू-काश्मीरमध्ये दाखल झाले. हल्लेखोरांना सोडणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह देशभरातील अनेक नेत्यांनी नि:शस्त्र पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे. काश्मीरमध्ये यंदा मोठ्या संख्येने देशी-विदेशी पर्यटक दाखल झाले आहेत. पहलगाम शहरापासून सहा किलोमीटरवरील बैसरनचे गवताळ पठार हे पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास अनेक पर्यटक खान-पानाचा आनंद घेत असताना दहशतवाद्यांनी त्यांच्या दिशेने बेछूट गोळीबार केला. त्यामुळे पर्यटकांमध्ये गोंधळ उडाला. मोकळे मैदान असल्यामुळे पर्यटकांना कुठे लपण्याची संधीही मिळाली नाही. अंदाधुंद गोळीबार करून अतिरेकी पळून गेले.

स्थानिक लोकांनी खेचरावरून जखमींना रुग्णालयात नेल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. बैसरन खो-यात अरुंद वाट असल्याने चालत किंवा खेचरावरून जावे लागते. दहशतवादी टेकडीवरून खाली उतरले आणि त्यांनी ४० पर्यटकांना घेरून त्यांच्यावर गोळीबार केला. याआधी पहलगाममध्ये अमरनाथच्या तळावर २000 मध्ये झालेल्या हल्ल्यात ३0 जण ठार तर ६0 हून अधिक जखमी झाले होते. बैसरनमध्ये मोठ्या संख्येने अनेक पर्यटक उन्हाळ्याची सुटी घालवण्यासाठी आले आहेत. त्यामुळे स्थानिक वाहतूक सेवा, शिकाराचालक, हाऊसबोट चालक आणि हॉटेलचा व्यवसाय तेजीत आहे. मात्र आता तेथे दहशतवादी हल्ला झाल्याने या सर्वांच्या उत्पन्नावर गदा आली आहे. या हल्ल्यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये सावधानतेचा इशारा देण्यात आला. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली, सामानाची तपासणीही करण्यात येत होती. सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग १-ए बंद करण्यात आला. त्यामुळे पर्यटकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागला. पहलगाममधील हल्ल्याशी पाकिस्तानचा काहीही संबंध नसल्याचे पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी म्हटले आहे.

त्यांनी या हल्ल्यासाठी भारतालाच जबाबदार धरले आहे. भारतातील लोकांचाच यात हात आहे. भारतातील अनेक राज्यांत सरकारविरोधात रोष आहे. नागालँडपासून काश्मीर आणि छत्तीसगड, मणिपूरमध्ये लोक सरकारविरोधात आहेत. भारत सरकार लोकांच्या हक्कांवर गदा आणत आहे, त्यांचे शोषण करत आहे. अल्पसंख्याकांचे शोषण होत आहे. त्याविरोधात लोक उभे आहेत. आमचा याच्याशी काही संबंध नाही, आम्ही दहशतवादी कृत्यांचे समर्थन करत नाही असे आसिफ म्हणाले. दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून दिल्लीत परतले. दिल्ली विमानतळावरच त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि परराष्ट्र सचिवांसोबत बैठक घेतली. गृहमंत्री अमित शहा जम्मू-काश्मीरमधील परिस्थितीचा आढावा घेत आहेत. दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी कारवाई सुरू केली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर आपल्यावर सर्जिकल स्ट्राईक होतो की काय अशी पाकिस्तानला भीती वाटत आहे. तेथे पाकिस्तानी हवाई दल अलर्ट मोडवर होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून दहशतवादाविरोधात देश एकजूट आहे असे म्हटले आहे.

# श्री नाथ संप्रदाय वारकरी संप्रदाय यांचा पवित्र संगम

शिराळा : भारताच्या हिमालयापासून ते रामेश्वपर्यंत या संपूर्ण भारत वर्षांवर प्रभाव टाकणारा संप्रदाय म्हणजेच नाथ संप्रदाय सर्व जाती-जमातीच्या लोकांना सामावून घेऊन स्त्री शुद्रांचा हिंदू मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार करणारा संप्रदाय आहे हा शैव सांप्रदाय मानला जातो आणि वैष्णव म्हणजे वारकरी संप्रदाय एक धार्मिक सांस्कृतिक परंपरा जी विठ्ठल भक्तीत व नामस्मरणात आहे. या दोन्ही परंपरांचा पवित्र संगम म्हणजे ३२ शिराळ्याची गोरखनाथ यात्रा की ज्या यात्रेला हजारो वर्षांची परंपरा आहे चैत्र महिन्याच्या वरुथिनी एकादशीला ही यात्रा भरते यावेळी एक पवित्र अध्यात्मिक वातावरण निर्माण होते.



नाथ संप्रदायात आदिनाथ शिवशंकर यांना मानले जाते त्यानंतर बडे बाबा मच्छिंद्रनाथ यांनी नाथ संप्रदायाची स्थापना केली आणि त्यांचे प्रथम शिष्य म्हणजे गुरु महायोगी गुरु गोरखनाथ होय यानंतर प्रमुख नवनाथ व ८४ सिद्ध पुरुषांची नामावली येते गुरु गोरखनाथ यांनी भारतात विविध ठिकाणी तपस्या केली शिराळा येथील तोरणा व मोरणा संगमावर बारा वर्षे तपश्चर्या करून आपली कायमची अधिवासाची भूमी निर्माण केली याविषयी अनेक कथा सापडतात त्यानंतर त्यांनी नाथ संप्रदायाचा प्रचार प्रसार केला.

त्याच्या पाऊलखुणा भारतभर तसेच परदेशात ही सापडतात नाथ हे शिवजती चिरंजीवी मानले जातात त्यांचा वास आजही शिराळा या ठिकाणी असल्याचे आपणास जाणवते गुरु गोरक्षनाथ ग्रंथसंपदा - गुरु गोरक्षनाथ रचित असंख्य ग्रंथ आहेत. अमनस्कयोग, अमरोगघप्रबोध, गोरक्षपद्धती, गोरक्ष संहिता, सिद्धसिद्धांतपद्धती, योग मार्तंड, असे असंख्य ग्रंथ संस्कृत व हिंदी भाषेत आहेत. त्यापैकी बऱ्याच ग्रंथांचे या लिखाण परिसरामध्ये केल्याचे संदर्भ सापडतात गुरु महायोगी गोरक्षनाथांनी संपूर्ण मानव जातीला दिलेले योगदान म्हणजे योग होय ते अध्यात्मातील एक प्रभावी शक्ती होते काही ग्रंथांमध्ये गोरखनाथ यांनी चारही युगात अवतार घेतल्याचे उल्लेख आहेत त्यांनी योगसामर्थ्याने भारताच्या अध्यात्माचे शुद्धीकरण केले गोरखनाथांनी योग साधना कर्मयोग, भक्तीयोग याद्वारे आत्मसाधना मनोविकास यांना महत्त्व देऊन धर्मभेद वर्णभेद जातिभेद न करता भारतीय धर्म साधनेची बैठक निर्माण केली.

गुरु गोरक्षनाथ यांना संत ज्ञानेश्वर'योगाबजनीसरोवर'तसेच 'विषयविध्वंसकवीर'असेही ही संबोधले आहे ते कधीही मोहजालात फसले नाहीत त्यांच्यामध्ये एकूण असणारे पुरुषाचे ३२ लक्षणे होती. वारकरी संप्रदाय हा वैष्णव सांप्रदाय म्हणून मानला जातो तो विठ्ठलाच्या भक्तीत रममाण होणारा चिंतनशील भक्ती चळवळीचा असणारा समाजरूप सांप्रदाय होय याही ठिकाणी सर्व जाती पंथातील लोकांना स्थान आहे ज्ञानेश्वर ,ज्ञानदेव, मुक्ताई चोखामेळा ,सावता माळी, गोरोबा कुंभार अशा विविध जाती धर्मातील संतांची परंपरा यास लाभली आहे वारकरी संप्रदायाने शैव वैष्णव परंपरेवर वर भर दिला. संत ज्ञानेश्वर गुरुपरंपरेने नाथपंथीय होते त्यांच्या विचारसरणीचा ठसा या सांप्रदायावर आहे नऊ नाथांपैकी गहिनीनाथ यांचे शिष्य असणारे निवृत्तीनाथ हे ज्ञानेश्वरांचे गुरु बंधू होय

आदिनाथशंकर-मच्छिंद्रनाथ -गोरक्षनाथ्गहिनीनाथ-निवृत्तीनाथ- ज्ञानेश्वर अशी गुरुप परंपरा मानली जाते म्हणूनच म्हटले जाते

**आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा।**
**मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य||**
**मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला।**
**गोरक्ष वोळला गहिणीप्रती||**
**गहिनी प्रसादे निवृत्ती दाता|**
**ज्ञानदेवा सार चोजविले||**

या गुरुपरंपरेतूनच नाथ संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यांचा पवित्र संगम झाला या दोन्ही संप्रदायांनी एकत्रित येऊन व्रतवैकल्य यांचे स्तोम न ठेवता अद्वैत भक्ती ज्ञान उपासना विवेक व एकात्मतेवर भर दिला आणि बहुजन समाजात नवचैतन्य आणले नाम कीर्तनाचा साधा सोपा मार्ग समाजापुढे ठेवला वारकरी संप्रदायाने कधीही अध्यात्माचे अवडंबर माजविले नाही कीर्तन अभंग गवळणी ओव्या भारुडे या सुलभ मार्गांचा वापर केला व स्त्री- शुद्रांना अध्यात्मात स्थान दिले आणि भक्तिमार्गाची चळवळ निर्माण केली.

आज वरुथिनी एकादशी गावोगावच्या दिंड्या गोरखनाथ दरबारात येतात चैत्र कृष्ण एकादशीस हा शैव वैष्णवांचा मेळा भरतो या दिवशी शिराळा नगरी टाळ मृदुंगांच्या गजराने दुमदुमून जाते महाराष्ट्राबरोबर कर्नाटकऊनही मोठ्या प्रमाणात दिंड्या या ठिकाणी सामील होतात नाथ मंदिर परिसरात जणू प्रति पंढरपूर यात्रेचा साज चढतो दिंड्या या ठिकाणी राहुट्या करून राहतात ज्या संमावर गुरु गोरक्षनाथांनी अवघड तपस्या केली त्याच संगमावर शैव वैष्णवांचा मेळा भरतो आणि वारकरी नाथ संप्रदायाचा पवित्र संगम होतो आणि गुरु गोरक्षनाथ संत ज्ञानेश्वर तुकाराम महाराजांचा जयघोष होतो

**- प्रा सम्राट विजयसिंह शिंदे**
B-Bped MA.MPhil.L.L.B.

# नागोठणे येथे पिसाळलेल्या कुत्र्यांची दहशत

## कुत्र्यांनी सतरा जणांना चावा घेतला

रायगड (याकूब सय्यद) :: नागोठणे गावात दिवसाना दिवस भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे त्या भटक्या कुत्र्यांपैकी एक भटका चावलेला कुत्रा त्या कुत्र्याने इतर कुत्र्यांना देखील चावा घेतला आहे त्यामुळे नागोठणे परिसरात ते भटके चावलेले कुत्र्यांची संख्येत वाढ झाली आहे.

दोन दिवसात पिसाळलेले कुत्र्या समोरील वय वृद्ध लहान मुले तरुण मुले हे पदाचारी रस्त्यावरून रस्ताक्रम करत असताना ते भटके पिसाळलेले कुत्रे थेट त्या समोरच्या व्यक्तीवर जीव घेणे हल्ला करीत चावा घेऊन त्या व्यक्तीला खूप मोठी अशी शारीरिक दुखापत पोचविली आहे ही घटना अतिशय चिंताजनक आहे मंगलवार बुधवार या दोन दिवसात १७ लोकांना पिसाळलेल्या कुत्र्यांनी चावा घेतला आहे.

चावा घेतलेल्या व्यक्तींपैकी त्यात लहान मुले वयोवृद्ध पुरुष तरुण मुले



असून संबंधित व्यक्तींना पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेऊन त्यांना घायल केले आहे भटके चावलेल्या कुत्र्यांनी ज्या व्यक्तींना चावा घेतला आहे त्या व्यक्तींना नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचार करिता घेऊन गेले असता त्यापैकी किरकोळ दुखापत झालेल्या रुग्णांवर उपचार करण्यात आला आहे परंतु जास्त शारीरिक दुखापत झालेल्या रुग्णांना पुढील उपचाराकरिता नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी रायगड जिल्हा आरोग्य केंद्र अलिबाग येथे उपचाराकरिता पाठविले आहे गावात भटक्या चावलेला कुत्र्यांमुळे लहान मुले वयोवृद्ध महिला पुरुष तरुण माणसांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असल्यामुळे घरातून बाहेर पडण्यासाठी दहशतीखाली लोकांना घराच्या बाहेर जावं लागत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था नागोठणे ग्रामपंचायतीने भटके व पिसाळलेले कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा तसेच भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांच्या दहशतीखाली दोन दिवसापासून वावरात असलेले नागोठणेतील तमाम जनतेची सुटका करण्यात यावी अशी नागोठणे गावातील जनतेची शासकीय प्रशासकीय यंत्रणाकडे जोरदार मागणी होत आहे.

# वडूज-गोपुज रस्त्यावर ट्रक ओढ्यात पलटी



औंध : वडूज गोपुज रस्त्यावर वडूजकडे जाणाऱ्या पुलाजवळ रस्त्याचा अंदाज न आल्याने खड्ड्यात आढळून ट्रक पलटी झाल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली आहे, सुदैवाने यामध्ये चालक सुखरूप असून कोणतीही जीवितहानी नाही. याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी की, कराड-वडूज ट्रान्सपोर्ट (मालवाहतूक) सेवा देणारा आयशर कंपनीचा ट्रक क्रमांक एम. एच. १४ ए. एच. ६३७३ हा कराडवरून वडूजकडे निघाला होता, ट्रान्सपोर्ट व्यवसाय असल्यामुळे माल खाली करीत करीत येत होता, गोपूजवरून वडूजकडे निघाल्यावर ओढ्याच्या जवळ समोरासमोर दोन खड्डे आहेत त्यांचा अंदाज न आल्याने चालकाचा ताबा सुटून ट्रक उजवीकडील फरशी पुलात पलटी झाला, पलटी झाल्यानंतर भेदरलेला चालक गाडीच्या खालून कसबसा बाहेर आला. सुदैवाने चालकास किरकोळ मार लागला आहे. पलटी झालेला ट्रक पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती, सायंकाळी उशीरपर्यंत ट्रक काढण्याचे काम सुरु होते.

**सुदैवाने जीवितहानी नाही..**

**समोरासमोरील जीवघेणे खड्डे मुजविण्याची मागणी:-या खड्ड्यामुळे आतापर्यंत अनेक दुचाकीस्वार जखमी झाले आहेत, आता या खड्ड्याचा अंदाज न आल्याने ब्रेक दाबल्याने गाडी पलटी झाली असे चालकाचे म्हणणे आले असून हे खड्डे त्वरित बुजवा अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य धनाजी पाटील व ग्रामस्थांनी केली आहे.**

## उन्हाची तीव्रता वाढल्याने नागरिक त्रस्त...

(पान १ वरून) मिळत आहे. दुपारच्या वेळेस प्रवासी वर्ग बाहेर जाणे टाळताना दिसतात.उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे नागरिक हैराण होत आहेत. त्यामुळे विविध ठिकाणी थंडपेयाची दुकाने थाटली असल्याचे चित्र दिसून येत आहे. उखाड्यापासून दिलासा मिळण्यासाठी नागरिकांनी उसाचा रस, लिंबू पाणी, कोकम सरबत, अधिक पसंती दिली आहे. सर्व स्टॉलवर ही पेय हमखास मिळत आहेत.कामानिमित्त येणारे बहुतांश नागरिक काही मोक्याच्या ठिकाणी असलेल्या स्टॉलवर मोसंबी, डाळिंब, संत्री आदी फळांचा ज्यूस पिण्यासाठी गर्दी करीत असल्याचे हि चित्र आहे.तर लहान मुले देखील कच्ची कैरी,बर्फाचा गोळा खाण्याचा आनंद घेत असल्याचे चित्र शहरांमध्ये दिसत आहे. धार्मिक कार्यक्रम,विवाह सोहळे व इतर कार्यक्रमांसाठी प्रवासी वर्गाची उसाच्या रसाला पसंती तर विवाह समारंभ, सण-उत्सावात ताक, मठ्ठा या पेयांना पसंती दिली जात आहे.दही, तूप, ताक, लोणी आदींची विक्री वाढली आहे.दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता जास्त असल्याने उन्हाळ्याच्या दिवसात पिण्यासाठी थंड पाणी पिणे आवश्यक असते त्यासाठी माठाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. माठातील पाणी आरोग्यासाठी फायदेशीर ठरत असल्याने शहरातील नागरिकांचा माठ खरेदी कडे जास्त कल असल्याने माठाची प्रचंड मागणी वाढली आहे. तसेच सतत च्या वातावरणातील बदलामुळे लहान मुले व वयोवृद्धांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.परिणामी प्रवासी वर्ग व शेतकरी वर्ग सावलीचा आधार घेताना दिसत आहेत.

## पेहलगाम घटनेचा शिराळा येथे सर्वपक्षीय ...

(पान १ वरून) झालेल्या अमानुष गोळीबार करुण केलेल्या हल्लयावर अनेक मान्यवरांनी संताप व्यक्त केला. यावेळी काश्मीर हल्लयामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप पर्यटकांना शिराळा सर्व पक्षीय नागरिकांच्या कडून श्रद्धांजली वाहण्यात आली. या निषेध व श्रद्धांजली कार्यक्रमांमध्ये प्रदेश उपाध्यक्ष किसान मोर्चा जयसिंगराव शिंदे-सरकार, रणधीर नाईक , विराज नाईक , ड.भगतसिंग नाईक ,रणजीत नाईक ,भूषण नाईक, बाजीराव देशमुख ,सम्राट शिंदे, महादेव कदम, देवेंद्र पाटील , विजयराव नलावडे, संभाजीराव नलवडे ,बंडा कदम, उत्तम निकम ,महेश पाटील , अशोक पाटील,सत्यजित पाटील ,चंद्रकांत पाटील ,अजय जाधव , ड.नेहा सूर्यवंशी, सीमा कदम , अनिता निकम,अजय जाधव, वैभव कांबळे, अमित गायकवाड ,लाला तांबीट, ज्योतिर्लिंग पाटील , बाबा कदम, दिलीप कदम , ड.अक्षय कदम, दस्तगीर आतार , डॉ. अजीन मुल्ला, दिलावर मोमीन ,महबूब मुल्ला, सिकंदर पठाण, बंडा जोशी,सर्व पक्ष,सर्व संघटनांचे पदाधिकारी , कार्यकर्ते व व्यापारी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सौर कृषी वाहिनी योजना अंमलबजावणी; मुख्यमंत्र्यांकडून अधिकाऱ्यांचे अभिनंदन

मुंबई - शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या आतापर्यंतच्या अंमलबजावणीबद्दल मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी मुंबईत ऊर्जा खात्याच्या अधिकाऱ्यांचे तसेच जिल्हाधिकारी आणि सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.



सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीस अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डिकर, राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव (महसूल) राजेश कुमार, प्रधान सचिव (ग्रामविकास) एकनाथ डवले, मा. मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे व सचिव श्रीकर परदेशी, महावितरणचे संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी तसेच सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी योजनेच्या अधिक गतिमान अंमलबजावणीसाठी तयार केलेल्या सिंगल विंडो पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी योजनेच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय व तांत्रिक अडचणींचा आढावा घेतला आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्राधान्याने अडचणी दूर करण्याची सूचना केली. सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील विलंबाबद्दल तक्रार केली जाते. तथापि, अचूक धोरण आणि निश्चित अंमलबजावणी असेल तर सरकारी योजनासुद्धा गतीने अंमलात आणली जाते याचे ही योजना उदाहरण आहे, असे ते म्हणाले.

या योजनेच्या अंतर्गत राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्याच्या आधारे सर्व कृषी फीडर चालविण्यात येणार आहेत. आतापर्यंत राज्यात १३५९ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प पूर्ण झाले असून त्यामुळे २ लाख १४ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होऊ लागला आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १५,२८४ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे काम चालू आहे. एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचा हा जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे.

सध्या शेतकऱ्यांना कृषीपंपांसाठी दिवसा आणि रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरठा होतो. केवळ दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी या योजनेमुळे पूर्ण होणार आहे. सप्टेंबर २०२६ पर्यंत योजनेची अंमलबजावणी पूर्ण होईल. मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये या योजनेचा शुभारंभ झाला.

त्यानंतर अल्पावधीत सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठी ४० हजार एकर जमीन उपलब्ध करणे, सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठीची टेंडर काढून खासगी विकासकांना कार्यादेश देणे, नव्याने निर्माण होणारी वीज कृषी पंपांपर्यंत कार्यक्षमतेने पोहचविण्यासाठी वीज जाळे बळकट करणे अशी कामे गतीने सुरू आहेत. या योजनेत सुमारे ६५ हजार कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक होणार आहे व ग्रामीण क्षेत्रात ७०,००० रोजगार उपलब्ध होणार आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये महावितरणला सरासरी तीन रुपये प्रती युनिट इतक्या किफायतशीर दरात वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कृषी पंपांना मोफत वीज देण्यासाठी राज्य सरकारकडून द्याव्या लागणाऱ्या अनुदानात मोठी कपात होईल. तसेच उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणे शक्य होणार आहे. एकूणच कृषी आणि उद्योग क्षेत्रांसाठी ही गेमचेंजर योजना आहे. केंद्र सरकारने या योजनेची प्रशंसा केली असून अन्य राज्यांना तिचे अनुकरण करण्याची सूचना केली आहे. या योजनेसाठी महावितरणला इंडियन स्मार्ट ग्रीड फोरमचा राष्ट्रीय पुरस्कार, स्कोच वॉर्ड असे राष्ट्रीय स्तरावरील सुमारे २० पुरस्कार मिळाले आहेत.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ✲ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

दैनिक कृष्णा एक्सप्रेस
KRISHNA EXPRESS

DAILY KRISHNA EXPRESS





# पांचगणी येथे सर्वपक्षीय कॅन्डल मार्च

पाचगणी (विकास जंगम) : जम्मू, काश्मीरमधील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात २७ हून अधिक पर्यटकांचा मृत्यू झाला. तर काही पर्यटक दहशतवादी हल्ल्यात गंभीर जखमी झाले या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज सायंकाळी पांचगणी शहरात सर्वपक्षीय निषेध मोर्चा व कॅन्डल मार्च काढण्यात आला. यावेळी पाकिस्तान मुर्दाबाद च्या घोषणांनी पर्यटन स्थळ दणाणून गेले. पहलगाम येथील बैसरन पर्वत रांगेच्या खोऱ्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला. पर्यटकांना धर्म विचारून गोळ्या झाडण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या हल्ल्यानंतर अख्खा देश संतप्त झाला. सर्वत्र निषेध मोर्चे होत असताना पांचगणी या पर्यटन स्थळावरील सर्व धर्मीय एकत्र आले आणि आज हजारोंच्या संख्येने उपस्थितीत भव्य असा बस स्थानकापासून कॅन्डल मोर्चा काढला. यामध्ये प्रत्येकाच्या हातात प्रज्वलित केलेली कॅन्डल होती. यामध्ये शालेय मुले, सर्वधर्मीय लोक सहभागी झाल्याने निषेध रॅलिने वेगळीच उंची गाठली. यावेळी भारत माता की जयहिंदुस्थान झिंदाबादपाकिस्तान मुर्दाबाद या घोषणा देण्यात येत होत्या.

हा कॅन्डल मार्च छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यावर या ठिकाणी निषेधाबरोबरच सर्वधर्मीय प्रार्थना करण्यात आली. पहलगाम येथील भ्याड हल्ल्याचा निषेध करीत अशा देशविघातक प्रवृत्तींना ठेचून काढा अशा भावना व्यक्त करण्यात येत होत्या. या रॅलीत शहरातील सर्व धर्मीय नागरिक सहभागी झाले होते.

# आर्चबिशप हाऊस येथे पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली


मुंबई : महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी कुलाबा मुंबई येथील आर्चबिशप हाऊस येथे आयोजित प्रार्थना सभेत सहभागी होऊन रोमन कॅथोलिक चर्चचे प्रमुख दिवंगत पोप फ्रान्सिस यांना आपली श्रद्धांजली अर्पण केली.



राज्यपालांनी पोप फ्रान्सिस यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली आणि काही क्षण स्तब्ध उभे राहून त्यांना आदरांजली वाहिली.

प्रार्थना सभेला मुंबईचे आर्चबिशप जॉन रॉड्रिग्स, विविध धर्मांचे प्रतिनिधी आणि मुंबईतील विविध देशांचे वाणिज्यदूत उपस्थित होते.

# औंध येथे श्री ग्रंथराज पारायण सोहळा आयोजन



औंध : औंध येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज पारायण सोहळयाचे आयोजन रविवार दि.२७ ते रविवार दि.४ मे अखेर केले जाणार आहे. नियमित सकाळी काकड आरती,श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी वाचन, हरिपाठ, महाप्रसाद वाटप केले जाणार आहे. पारायण सोहळ्यानिमित्त ह.भ.प. सर्वश्री रोहिदास मस्के, पुरूषोत्तम मोरे, गुलाब खालकर,कबीर आत्तार, पुरूषोत्तम दादा पाटील, समाधान भोजेकर, समाधान शर्मा, नामदेव लबडे यांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

या पारायण सोहळ्यासाठी गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. व्यासपीठ चालक म्हणून ह.भ.प. उध्दव महाराज काम पाहणार आहेत .पण.पू. शाहपुरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे. रविवार दि.४मे रोजी भव्य दिंडी सोहळा औंध गावातून काढला जाणार आहे. या पारायण सोहळयाचा लाभ औंध पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी घ्यावा असे आवाहन श्री ज्ञानेश्वरी पारायण कमिटी व औंध ग्रामस्थांनी केले आहे.

# अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर शुभ कार्य आणि दानधर्म करण्याबरोबरच इतरांसाठी तर्पण आणि पिंड दान करण्याचेही महत्त्व आहे. या दिवशी पितरांसाठी मातीचे भांडे म्हणजे घट याचे दान करावे. उन्हाळ्यात पाण्याने भरलेला घट दान केल्यास इतरांना शीतलता मिळते आणि त्यांचे आशीर्वाद देखील आपल्याला मिळतात. त्याचप्रमाणे या दिवशी भगवान विष्णूची चंदनाने पूजा करण्यास विशेष महत्त्व आहे. अक्षय तृतीयेच्या दिवशी शुचिर्भूत होऊन भगवान विष्णूची पूजा करावी.अक्षय्य तृतीयेचा दिवस माफीचा दिवस म्हणूनही मानला जातो. त्या दिवशी जर एखाद्या व्यक्तीने आपल्या किंवा आपल्या प्रियजनांकडून कळत नकळत झालेल्या चुकांसाठी माफी मागितली तर त्याच्या सर्व चुका माफ होतात आणि त्याला देवतांकडून आशीर्वाद मिळतो असे मानले जाते.

**– शंकर पवार,** सातारा.

# महाबळेश्वर महापर्यटन महोत्सवाचे काउंटडाऊन सुरू









महाबळेश्वर(अजित जगताप): थंड हवेचे ठिकाण असलेले महाबळेश्वर मध्ये सध्या'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५'च्या तयारीचा चांगल्याच वेग आलेला आहे .या महोत्सवाच्या निमित्ताने महाबळेश्वर नगरीमध्ये सुख सुविधा उपलब्ध करण्यासाठी सर्व यंत्रणा कामाला लागलेल्या असून पर्यटनाच्या अनुषंगाने काउंटडाऊन सुरू झाली आहे.


महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि सातारा जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने हा पर्यटन महोत्सव शुक्रवार दिनांक २ ते रविवार दिनांक ४ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार दिनांक एक मे रोजी जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिन असल्यामुळे पर्यटकांची वाढती गर्दी पाहून उच्चांकी रोजगार व व्यवसाय उपलब्ध होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. महाबळेश्वर येथील पर्यटन महोत्सवाच्या अनुषंगाने पर्यटन मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. शंभूराज देसाई साहेब यांनी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात महोत्सवाच्या नियोजनाचा बारकाईने आढावा घेतला.या महोत्सवास राज्याच्या विविध भागातून तसेच परराज्यातूनही पर्यटक मोठ्या प्रमाणावर येणार आहेत. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी समन्वय राखून चोखपणे जबाबदारी पार पाडण्याची सूचना सर्वांना देण्यात आलेली आहे. देशी व परदेशी पर्यटकांना महाबळेश्वर महाव पर्यटन महोत्सवाचा आनंद द्विगणित करून देण्यासाठी कोणतेही अडचण येऊ नये. याची खबरदारी घेण्यात आलेली आहे. तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस यंत्रणा आणि आरोग्य विभाग यांना सतर्कतेचा इशारा दिलेला आहे. महाबळेश्वर महा पर्यटन महोत्सवाच्या कार्यक्रमात हेलिकॉप्टर राईड, लेसर शो, स्वरोत्सव, साहसी उपक्रम, फुड फेस्ट आणि आनंदयात्रा, लहान मुलांसाठी विविध खेळ, कार्निवल परेड, उत्सव महाराष्ट्राचा समृध्द परंपरेचा, किल्ला व शस्त्र प्रदर्शन, साहसी व मर्दानी खेळ, टेंटसिटी, ड्रोन शो, योग, वाद्यसंगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, बोट प्रदर्शन यास अनेक गोष्टींचा अंतर्भाव केला आहे.महोत्सवाच्या आयोजनाबाबत मोठ्या प्रमाणावर संपूर्ण महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करावी. असे निर्देश पालकमंत्री मा. ना. शंभूराज देसाई यांनी दिले आहेत. यासाठी नामांकित एजन्सीची नेमणूक केलेली आहे. त्या महोत्सवाला व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या सर्वच घटकांचा विचार करून त्यांनाही सुविधा देण्याची मागणी सातारा जिल्ह्यातील विशेषता जावळी व महाबळेश्वर येथील स्थानिक पत्रकार संघटनेच्या अनेक मान्यवरांनी केलेली आहे. महाबळेश्वर महोत्सवाला चांगल्या पद्धतीने नियोजन करावे. यासाठी सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, सातारचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या क्षमा पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी सुनील गाढे यांच्या महाबळेश्वर नगरपालिका प्रशासन व पोलीस यंत्रणा त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते यांचा सुद्धा मोलाचे योगदान लाभत आहे. एकूणच या महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव मधून राज्यातील पर्यटन वाढीसाठी अनुकूल वातावरण असल्याचा संदेश जाणार आहे.

त्यामुळे पर्यटन क्षेत्राला पुन्हा एकदा चांगल्या पद्धतीने झळाळी येणार आहे. उन्हाळ्यामध्ये शाळा- महाविद्यालय व इतर घटकाला सुट्टी असल्यामुळे या पर्यटन महा पर्यटन महोत्सवाला किमान लाखभर पर्यटन देण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

# महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव सर्व यंत्रणांनी मिळून यशस्वी करावा

## पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी घेतला आढावा

सातारा : सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे प्रथमच 'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५' मोठ्या स्वरूपात साजरा होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि सातारा जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने हा पर्यटन महोत्सव २ ते ४ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात या पर्यटन महोत्सवाच्या तयारीचा आढावा पर्यटन मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आढावा घेतला.



या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या क्षमा पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे आदी उपस्थित होते.

महापर्यटन महोत्सव २०२५ हा महाबळेश्वर होत असून या २ ते ४ मे या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवास राज्याच्या विविध भागातून तसेच परराज्यातूनही पर्यटक मोठ्या प्रमाणावर येणार आहेत.

त्यामुळे सर्व यंत्रणांनी समन्वय राखून आपापली जबाबदारी चोखपणे राबवावी. येणाऱ्या समस्या सोडवाव्यात. वाहतूक, कायदा व सुव्यवस्था अंत्यत उत्कृष्ट राहील याबाबत काटेकोर दक्षता घ्यावी.

या कार्यक्रमामध्ये यामध्ये हेलिकॉप्टर राईड, लेसर शो, स्वरोत्सव, साहसी उपक्रम, फुड फेस्ट आणि आनंदयात्रा, लहान मुलांसाठी विविध खेळ, कार्निवल परेड, उत्सव महाराष्ट्राचा समृध्द परंपरेचा, किल्ला प्रदर्शन, शस्त्र प्रदर्शन, साहसी व मर्दानी खेळ, टेंटसिटी, ड्रोन शो, योग, वाद्यसंगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, बोट प्रदर्शन आदी कार्यक्रम होणार असून याबाबत व एकूणच महोत्सवाच्या आयोजनाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

# आतंकवादाला धर्म असतो

२२ एप्रिल रोजी जम्मू - काश्मीर येथील पहलगाममधील बैसरण या पर्यटनस्थळ असणाऱ्या भागात जिहादी आतंकवाद्यांनी अमानुष गोळीबार केला. पर्यटकांना त्यांचा धर्म कोणता आहे? असे विचारले. आतंकवाद्यांसाठी जे काफीर हिंदु होते त्यांच्यावर गोळीबार करुन त्यांचा जीव घेतला.या आक्रमणात २८ जणांचा मृत्यू झाला तर काहीजण गंभीररीत्या घायाळ आहेत. संवेदनशील असलेल्या भागात पोलीस बंदोबस्त नसणे ही खूप गंभीर बाब आहे. या घटनेमुळे देश आतंकवादाने पूर्णपणे पोखरून निघाला आहे हे परत एकदा सिद्ध होते. पाकिस्तान आणि काश्मीर मधील जिहादी मानसिकतेच्या धर्मांध मुसलमानांना कायमचा धडा शिकवल्याशिवाय काश्मीरमधील जिहादी आधी आतंकवाद कधीच संपणार नाही.

भारताचाच एक भाग असलेल्या काश्मीरमध्ये पर्यटकांना जीव मुठीत धरून जावे लागते ही गोष्ट अत्यंत लज्जास्पद आहे. देशाचा कोणताही नागरिक देशाच्या कुठल्याही भागात निर्धोकपणे जायला हवा. ही सर्वस्वी जबाबदारी सरकारची आहे. पहलगाममधील घटनेवरून बोध घेऊन जिहादी आतंकवादाचा कायमचा बंदोबस्त करणार ? का आणखीन निष्पापांचे बळी जाण्याची वाट बघणार ? हा प्रश्न ऐरणीवर आहे.

**– सुरेश पंडीत, सातारा.**

# गुंड नितीन पालकर याचा खून

## दोन हल्लेखोरांनी धारदार शस्त्रानी केले वार

इस्लामपूर : येथील कुविख्यात गुंड नितीन संजय पालकर (वय ३५) याचा दोन हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने वार करुन खून केला. भरदिवसा येथील वाळवा बझारसमोर घडलेल्या या थरारक घटनेने शहरात एकच खळबळ माजली आहे. मृत पालकर याच्यावर खून, खूनाचे प्रयत्न, खंडणी, हाणामारी असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याला मोक्काही लावण्यात आला आहे. तो सध्या जामिनावर बाहेर होता. या बाबत करण आनंदा जाधव, रा. किसाननगर, मोरे कॉलनी पाठीमागे पालकर मळा, ईश्वरपूर यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलीस व घटनास्थळावरुन मिळालेली माहिती अशी, गुरुवारी दुपारी येथील वाळवा बझार जवळ असलेल्या एका पानटपरीसमोर पालकर याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. गुरुवार हा बाजाराचा दिवस असल्याने या ठिकाणी मोठी वर्दळ होती. भर रस्त्यात रहदारीच्या ठिकाणीच हा हल्ला झाल्याने एकच आरडा ओरड झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पालकर याला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

खूनाची माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक मंगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक संजय हारुगडे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संशयितांच्या अटकेसाठी पोलिसांना सूचना केल्या. दोघा हल्लेखोरांनी हा खून केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. हल्लेखोरांच्या अटकेसाठी पथक



रवाना करण्यात आली आहेत. याच वाळवा बझार परिस यापूर्वी खूनाच्या तीन घटना घडल्या आहेत. पालकर याच खूनामुळे शहरात खळबळ माजली आहे.

फिर्याद देताना यश माने व वैभव थोरात दोन्ही रा. ईश्वरपूर ता. वाळवा जि. सांगली यांनी खून केल्याचे नमूद केले आहे. मयत नितीन पालकर याने यश माने याचे पान शॉपमध्ये बिलाचे पैसे न दिलेचे कारणावरुन काल झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन दोघांनी संगणमत करुन कोयता व चॉपरने नितीन संजय पालकर यांचे अंगावर ठिकठिकाणी वार केले. तसेच यातील फिर्यादी यांना कानाखाली मारुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे. पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद केला आहे. कालच वाघवाडी फाट्यावर एका युवकाचा खून झाला आहे. ही घटना ताजी असताना आज भर वस्तीत एका गुंडाचा खून झाल्याने शहरात चर्चा सुरू आहे.

# कामगार कल्याण समिती अध्यक्षपदी डॉ.सौ.योजना शिंदे-पाटील



इस्लामपूर : राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या कामगार कल्याण व जिमखाना समितीच्या अध्यक्षपदी डॉ.सौ. योजना शिंदे-पाटील यांची निवड करण्यात आली. कारखान्याचे अध्यक्ष,युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या संकल्पनेतून ही समिती नव्याने निर्माण करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून कामगारांचे हित, सुरक्षा,खेळ व आरोग्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे. डॉ.योजना शिंदे-पाटील या राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू आहेत. त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या व्हॉलीबॉल संघाचे नेतृत्वही केले आहे.

कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील यांच्या हस्ते डॉ.योजना शिंदे-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. माजी जि.प.अध्यक्ष व माल खरेदी समितीचे अध्यक्ष देवराज पाटील,शेती समितीचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, बांधकाम समितीचे अध्यक्ष कार्तिक पाटील, जलसिंचन समितीचे अध्यक्ष प्रदीपकुमार पाटील,उपपदार्थ व अभिनव उपक्रम समिती चे अध्यक्ष अतुल पाटील,ऊस विकास समिती चे अध्यक्ष अमरसिंह साळुंखे, कार्यकारी संचालक आर.डी.माहुली,कामगार नेते शंकरराव भोसले, तानाजीराव खराडे, कामगार प्रतिनिधी मनोहर सन्मुख प्रामुख्याने उपस्थित होते.

माजी मंत्री आ.जयंतराव पाटील, कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्यातील कामगारांच्यासाठी सोई-सुविधा उपलब्ध करून देताना त्यांची सुरक्षा जपणे,त्यांच्या कामाचा दर्जा वाढविणे, खेळ व आरोग्यास प्राधान्य देवण्याचे काम करू,अशी भावना डॉ.योजना शिंदे पाटील यांनी दिली. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील, कार्यकारी संचालक आर.डी.माहुली यांच्या सह सर्वांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी कामगार कल्याण अधिकारी महेश पाटील,मनुष्यबळ विकास अधिकारी अनिलकुमार पाटील,अर्कशाळा व्यवस्थापक धैर्यशिल पाटील,मुख्य लेखापाल संतोष खटावकर,ऊस विकास अधिकारी सुजय कुमार पाटील,जलसिंचन अधिकारी जे.बी. पाटील यांच्यासह कारखान्याचे अधिकारी उपस्थित होते.

# लोकनेते बाळासाहेब देसाई यांना ४२ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

पाटण – महाराष्ट्राचे पोलादी पुरुष, पाटण तालुक्याचे दैवत लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या ४२ व्या पुण्यतिथीनिमित्त पाटण तालुक्यातील दौलतनगर येथे प्रतिवर्षी साजऱ्या होणाऱ्या तीनदिवसीय श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा यंदाच्या वर्षी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे पुण्यतिथी दिवशी तीन दिवसीय श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाच्यानिमित्ताने भव्य दिव्य दिंडी सोहळयाने श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज व लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील लोकनेते साहेब यांचे पुर्णाकृती पुतळयावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करत पारायण सोहळयातील भाविक भक्तांच्या उपस्थितीत लोकनेते बाळासाहेब देसाई यांना विन्रम अभिवादन करण्यात आले.भव्यदिव्य दिंडी व रिंगण सोहळयाने दौलतनगरला सकाळपासून भक्तीमय वातावरण होते.

दौलतनगर (ता.पाटण) येथील महाराष्ट्र दौलत लोकनेते बाळासाहेब देसाई शताब्दी स्मारकामध्ये लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे ४२ व्या पुण्यतिथीनिमित्त गत पंधरा वर्षापासून सुरु असलेल्या श्री.ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाचे यंदाचे सोळावे वर्ष होते.या पारायण सोहळयामध्ये ७८३ वाचक सहभागी झाले होते.तर वारकरी साप्रंदयातील विविध मान्यवरांची प्रवचने,कीर्तने तसेच गावोगावच्या भजनांचे जागराचे कार्यक्रम यानिमित्ताने आयोजीत करण्यात आले होते.



या संपुर्ण पारायण सोहळयामध्ये श्रीमती विजयादेवी देसाई, पालकमंत्री नामदार शंभूराज देसाई, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई, सौ.स्मितादेवी देसाई, डॉ. सौ.वैष्णवीराजे देसाई, चि.जयराज देसाई, चि.आदित्यराज देसाई यांचा विशेष सहभाग होता. लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे पुण्यतिथी निमित्त आयोजित पारायण सोहळा यशस्वी करण्यासाठी ह.भ.प.जयवंतराव शेलार महाराज, ह.भ.प.अनिल पाटील महाराज पापर्डेकर, ह.भ.प.जगन्नाथ ठोंबरे महाराज ह.भ.प.दगडू माळी, नाना देसाई पापर्डेकर,शैलेंद्र शेलार,भरत पाटील,सुरेश शिंदे,अमित लोहार यांच्यासह त्यांचे सहकारी यांचाही सहभाग होता.

तीन दिवसीय श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाचन पुर्ण झालेनंतर लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे पुण्यतिथी दिवशी फुलाने सजविलेल्या पालखीत श्री ज्ञानेश्वर महाराज,संत तुकाराम महाराज व लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमा ठेवून टाळ मृदुंगाच्या तालावर,डोक्यावर कलश,तुळशी वृंदावन घेतलेल्या सुहासिनी महिला ढोल वाद्यांसमवेत श्री विठ्ठल नामाचा तसेच ज्ञानोबा माऊली ज्ञानराज माऊली यांचे गजरात आणि लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयघोषात माऊलीच्या निघालेल्या भव्य दिंडीला लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे शताब्दी स्मारकापासून सुरुवात करण्यात आली.पारायण सोहळयाची भव्य दिंडी ही कारखाना कार्यस्थळावरील लोकनेते यांचे पुर्णाकृती पुतळयासमोर आलेनंतर नामदार शंभूराज देसाई यांचे संकल्पनेतून लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळयावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच २१ तोफांची सलामी देण्यात आली.

तसेच सातारा जिल्हा पोलीस दलाचेवतीने मान वंदना देण्यात आली. तर पुतळयासमोर अभंग व आरती करुन लोकनेते बाळासाहेब देसाई यांचा ४२ वा पुण्यतिथी सोहळा साजरा करण्यात आला.

त्यानंतर पुतळयासमोर भव्य असा रंगलेला रिंगण सोहळा हे दृष्य अत्यंत मनमोहक होते. चौथ्या दिवशी काल्याच्या किर्तनाने उपस्थित सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद देवून या अखंड हरीनाम भव्य सोहळ्याची सांगता करण्यात आली.लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे पुण्यतिथी दिवशी दौलतनगरला प्रती पंढरपुर अवतरले होते.

गत चौदा वर्षापासून ह.भ.प.पुडंलिक महाराज कापसे आळंदीकर हे या पारायण सोहळ्यामध्ये व्यासपीठ चालक म्हणून आपली सेवा बजावीत आहेत. यंदाचा सोहळयातही त्यांनी व्यासपीठ चालक म्हणून सेवा बजावली तर हा पारायण सोहळा यशस्वी करण्याकरीता मंत्री ना. शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ह.भ.प.जयवंतराव शेलार महाराज, ह.भ.प.अनिल पाटील महाराज, ह.भ.प.जगन्नाथ ठोंबरे महाराज यांच्यासह त्यांचे सहकारी यांचेसोबत लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी उद्योग व शिक्षण समूहातील अधिकारी व कर्मचारी यांनी कष्ट घेतले. या सोहळ्यास लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी उद्योग व शिक्षण समूहातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

### रिंगण सोहळा ठरला भाविकांसाठी आकर्षण

**लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे पुण्यतिथी निमित्ताने लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे पुतळ्यास अभिवादन केलेनंतर पुतळ्यासमोर प्रतिवर्षी साजरा करण्यात येणारा रिंगण सोहळा हा या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असते, या रिंगण सोहळ्यामध्ये अबाल वृध्दासह लहानथोर सर्वजण मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. यंदाच्या वर्षी लोकनेते साहेबयांचे पुण्यतिथी सोहळयानिमित्त रिंगण सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच हा रिंगण सोहळा पाहून उपस्थित भाविक भक्त भारावून गेले.**

# पत्रकारांना कायदेशीर माहिती असणे गरजेचे–वसंत साबळे



सातारा – दखल–अखलसह पत्रकारांना कायदेशीर माहीती असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन वसंत साबळे यांनी केले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कोषाध्यक्षपदी वरिष्ठ पत्रकार विनोद कुलकर्णी यांची निवड झाल्याने साताऱ्यातील पत्रकारांच्यावतीने येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे जाहीर सत्कार करण्यात आला. तेव्हा 'बीएनएस' या नवीन कायद्याचे मार्गदर्शन वसंत साबळे यांनी केले.यावेळी ऍड. संभाजी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरच्या कार्यशाळेचे आयोजन पत्रकार संघ, डिजिटल मीडीया व छत्रपती शिवाजी कॉलेज यांच्या संयुक्तविद्यमाने सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. वरिष्ठ पत्रकार विनोद कुलकर्णी यांनी पत्रकारितेसोबत, बँकींग, सहकार व साहित्य क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. साहित्य क्षेत्रातील त्यांचे योगदान पाहून साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असलेल्या संस्थेच्या अखिल भारतीय साहित्य महामंडाळाच्या कोषाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. त्यांची ही निवड सातारच्या पत्रकारितेचा हा गौरव आहे. ज्येष्ठ पत्रकार बापूसाहेब जाधव यांच्याहस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.तदनंतर अनेक पत्रकारांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार समारंभ पार पाडले. भारत देशाने आयपीसी रद्द करुन भारतीय न्याय संहिता अर्थात बीएनएस या कायद्याची अंमलबजावणी केली आहे. याच बदलेल्या कायद्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव तथा छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे, प्रमुख पाहुणे पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे, सत्कारमूर्ती विनोद कुलकर्णी, तुषार भद्रे, दिनकर झिंब्रे आदींनी मनोगत व्यक्त केली.सचिन काकडे यांनी आभारप्रदर्शन केले.

सदरच्या कार्यक्रमास जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येनी उपस्थीत होते.सरतेशेवटी स्नेहभोजनांचा आनंद उपस्थितांनी घेतला. याकामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष विठ्ठल हेंद्रे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर भोईटे, उपाध्यक्ष उमेश बांबरे, सातारा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय कदम, कार्याध्यक्ष बाळू मोरे, उपाध्यक्ष विजय जाधव, सुनील साबळे, डिजिटल मीडियाचे शहर अध्यक्ष प्रतीक भद्रे, कार्याध्यक्ष गुरुनाथ जाधव, उपाध्यक्ष साई सावंत व सदस्य यांनी अथक असे परिश्रम घेतले.

# वीस वर्षापासून सवादे यात्रेमध्ये शाकाहारी जेवण

कराड – सवादेकरांनी शाकाहारी यात्रेच्या प्रयोगातून सुसंस्काराची गुढी उभारली आहे. गावाने शाकाहारी यात्रेचा आगळा–वेगळा व स्तुत्य उपक्रम गेली वीस वर्षे राबविला असून या उपक्रमाचा वसा आणि वारसा अत्यंत यशस्वीपणे ग्रामस्थांनी जपला आहे. हे येणाऱ्या पिढीसाठी सुसंस्कार मिळावेत म्हणून केलेले अत्यंत मौलिक काम असल्याचे मत शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. सतीश घाटगे यांनी व्यक्त केले.सवादे (ता. कराड) येथील ग्रामदैवत श्री हनुमान शाकाहारी यात्रा विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी होत आहे. यात्रा कमिटीच्यावतीने गावातील गुणवंतांचा बक्षीस वितरण प्रमुख पाहुणे प्राचार्य प्रो. डॉ. सतीश घाटगे यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शनात करताना ते बोलत होते. सवादे गावच्या सरपंच सौ. जयश्री कदम, उद्योगपती वसंतराव चव्हाण, मुख्याध्यापक सौ. उषा दरेकर, चव्हाण मॅडम, माजी सरपंच संजय शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्राचार्य सतिश घाटगे म्हणाले, पूर्वीची मांसाहारी यात्रा बदलून शाकाहारी करणे ही सुद्धा एक सामाजिक लोकहिताची चळवळच आहे. कारण मांसाहारी यात्रेमध्ये सहभागी होणारी मित्रमंडळी, नातेवाईक हे केवळ आमंत्रण म्हणून येत असतात. ज्या देवाची यात्रा असते, त्या देवदर्शनासही जाणे टाळतात. यात्रेनिमित्त मांसाहार, धागडधिंगा असणारे कार्यक्रम हे चित्र हल्ली समाजामध्ये मोठ्या प्रमाणात पसरलेले आहे. परंतु, अशा बाबींना फाटा देऊन सवादेकारांनी मांसाहारी यात्रेचा त्याग करून शाकाहारी यात्रेचा प्रयोग राबवून ग्राम विकासाचे एक अत्याधुनिक मॉडेलच तयार केले आहे. या यात्रेच्या निमित्ताने गावातील गुणवंत विद्यार्थी, नागरिक, शिक्षकांनी केलेल्या कामाची पोहोचपावती या बक्षीस वितरण समारंभाच्या निमित्ताने दिली जात आहे. विविध क्षेत्रात ज्यांनी यश मिळवले, गुणवत्ता सिद्ध केली. त्यांच्या सत्काराच्या निमित्ताने गावातील इतरांना प्रेरणा मिळावी व आपणही काहीतरी यश प्राप्त करावे, अशी इच्छा नक्कीच प्रत्येकामध्ये जागृत होईल. जेणेकरून ग्रामदैवत हनुमानाची खऱ्या अर्थाने भक्तिभावाने सेवा होईल, हा उद्देश आहे. यात्रेच्या निमित्ताने संपन्न झालेले विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच कीर्तन, भारुड, भावभक्तीपर गीतांचे कार्यक्रम, ही महाराष्ट्राची सांस्कृतिक संपत्ती जतन करण्याचे कार्य या यात्रेच्या निमित्ताने होत असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.प्रारंभी, प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यामध्ये शिष्यवृत्ती, मंथन परीक्षा, चित्रकला स्पर्धा तसेच विविध वर्गात मिळवलेली गुणवत्ता, सेवानिवृत्त शिक्षक व उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा ट्रॉफी प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक प्रा. आत्माराम थोरात, सूत्रसंचालन संजय नांगरे, संजय शेंडे यांनी आभार मानले. यावेळी नितीन थोरात, प्रदीप थोरात, भिमराव पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसंतगड विकास सेवा सोसायटी चंद्रसेन पॅनेलचा विजय



करा़ड – वसंतगड (ता. कराड) विकास सेवा सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी चंद्रसेन पॅनलने सत्ता राखण्यात यश मिळवले.

पॅनल प्रमुख आर. वाय. नलवडे यांच्या पॅनल ने १२–१ असा विजय मिळवला. तर विरोधी नवक्रांती पॅनेलला अवघ्या एका जागेवर समाधान मानावे लागले.

चंद्रसेन पॅनलचे विजय उमेदवार पुढीलप्रमाणे :– नथुराम कदम, संभाजी कोकरे, रघुनाथ नलवडे, मोहन नांगरे, शंकर निंबाळकर, संतोष पाटील, लक्ष्मण महाडिक, आनंदा मोहिते, रत्नाबाई जामदार, आबासो कोकरे, दत्तात्रय गुरव, तानाजी वाघमारे हे आहेत.

वसंतगड विकास सेवा सोसायटीची निवडणूक अत्यंत चुरशीची पार पडली. यामध्ये बाजार समितीचे माजी सभापती आर.वाय. नलवडे यांच्या विरोधात गावातील सर्व गट एकत्रित झाले होते. तरीही चंद्रसेन पॅनलने आपली सत्ता राखण्यात यश मिळवले. विजयानंतर मोठा जल्लोष करत गुलाल उधळण करण्यात आला.

# महाराजाच्या नावामुळे कोयना धरणाची भव्यता वाढेल–विक्रमबाबा पाटणकर

पाटण – कोयना धरणाच्या जलाशयाचे छत्रपती शिवाजी महाराज जलाशय अशा होणाऱ्या नामकरणामुळे देशातच नाही तर संपूर्ण जगात कोयना धरणाची भव्यता वाढेल. छत्रपतींचे हे स्मारक चिरंत कालीन राहील याचा फायदा व लाभ कोयनानगरसह परिसराला चांगल्या पध्दतीने होईल असा विश्वास भाजपा पाटण विधानसभा मतदारसंघ प्रचार प्रमुख विक्रमबाबा पाटणकर यांनी पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

यावेळी भाजपाचे पाटण तालुका अध्यक्ष नंदकुमार सुर्वे, चंद्रकांत भिसे यांची उपस्थिती होती. विक्रमबाबा पाटणकर म्हणाले, खर वास्तविक पाटण तालुक्यातील तमाम जनतेसह महाराष्ट्रातील, देशातील जनतेची मागणी होती. कोयना धरण शिवाजी सागर या एकेरी नावाचे छत्रपती शिवाजी महाराज जलाशय असे नामकरण होण्याची जनतेच्या या मागणीचा पाठपुरावा भाजपा पाटण तालुका अध्यक्ष नंदकुमार सुर्वे यांनी केला आहे. या नामकरणाचे चांगले काम याआधी होणे अपेक्षित होते. पण तसे झाले नाही याची खंत व्यक्त करताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी तात्काळ घेतलेल्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत असल्याची जनभावना आहे.

विक्रमबाबा पाटणकर पुढे म्हणाले, या नामकरणासाठी जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार यांच्याकडे वेळोवेळी



मागणी करुन त्या अनुषंगाने छत्रपती उदयनराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची चर्चा झाली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आ. मनोज घोरपडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम या सगळ्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बरोबर मंत्रालयात बैठक लावली. या बैठकीत जलसंपदा मंत्र्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने या विषयाकडे पाहिले. आणि तातडीने या संदर्भात सचिवांना आदेश दिले.

कायदेशीर पध्दतीने या नामकरणाला भविष्यात याबाबतीत कोणतीही चूक राहता कामा नये. या सर्व बाबींचा अभ्यास करून तशा पद्धतीने शासन निर्णय काढून कोयना धरणाचे छत्रपती शिवाजी महाराज जलाशय असे नामकरण होणार आहे. या बैठकीत केवळ नामकरणाच्या बाबतीत चर्चा झाली असे नाही तर कोयना धरणाच्या जलाशयात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य दिव्य अश्वारूढ पुतळा ऊभा करण्याच्या बाबतीत देखील सकारात्मक चर्चा झाली. तशा पद्धतीचा आराखडा आठ दिवसांत तयार करण्याच्या सुचना मुख्य सचिवांना दिल्या आहेत. तसेच कोयना नगर च्या पर्यटन संदर्भात ज्या काही गोष्टी करता येतील त्या संदर्भात देखील आराखडा तयार करण्याच्या सुचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

कोयना नगरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पर्यटन आणि बाजार पेठ यांची झालेली दुर्दशा त्यावर झालेला परिणाम याचा विचार करुन कोयनेला मुळपदावर आणण्यासाठी व कोयनेची बाजारपेठ वाढविण्यासाठी भारतीय जनता पक्ष पूर्ण पणाने सक्षम राहिल अशा पध्दतीचे आश्वासन देखील यावेळी ना. पाटील यांनी दिले असल्याचे विक्रमबाबा पाटणकर यांनी शेवटी सांगितले.

# राजेंद्र पवार महावितरणच्या संचालक पदी रुजू

मुंबई : महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून श्री. राजेंद्र पवार यांनी शुक्रवारी (दि. २५) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्रावीण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतीवर त्यांनी सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता पदी काम केले आहे. सन २०११ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या काळात त्यांनी पेण, कळवण, नाशिक, पनवेल, कल्याण येथे काम केले आहे. तसेच अधीक्षक अभियंता म्हणून नागपूर व पुणे येथे काम केले आहे. तर गेल्या सव्वादोन वर्षांपासून श्री. पवार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत



होते.

संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी याआधीच्या सेवेत लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी महसूलवाढ, नवीन वीजजोडण्या, छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. सोबतच कर्मचारी प्रशिक्षण व कार्यशाळा, कर्मचारी प्रोत्साहनपर विविध उपक्रम, कर्मचारीपाल्यांची अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया आदींना मोठा वेग दिला.

त्यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण व विविध उपक्रमांमुळे पुणे लघु प्रशिक्षण केंद्राला सलग तीन वर्ष राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यापूर्वी श्री. पवार यांनी स्वतः 'ऑन फिल्ड' राहून मुंबईचा महापूर, 'तौक्ते', 'निसर्ग' चक्रीवादळे, 'कोरोना' आदी संकटांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे नेतृत्व केले आहे.

श्री. राजेंद्र पवार, संचालक (मानव संसाधन) – 'महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी मानव संसाधनाचे एक आश्वासक व्यवस्थापन सदैव उपलब्ध राहील. कंपनी व कर्मचारी हिताला प्राधान्य देत अंतर्गत प्रशासकीय कामकाज आणखी गतिमान करण्यासह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षणातून कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यावर भर राहणार आहे.'